नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक ०६/०६/२०२६ (शनिवार )

---

## पोलीस स्टेशन कळमेश्वर अंतर्गत आकाश नगर येथील सुदर्शन गेस्ट हाऊस मध्ये वेश्या व्यवसाय चालविणाऱ्यांवर गुन्हा नोंद, एका पिडीतेची सुटका, दोन आरोपी अटक
## अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंधक कक्ष, नागपुर ग्रामीण यांची कामगिरी

**पोलीस स्टेशन कळमेश्वर :–** दिनांक ०५/०६/२०२६ रोजी अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंधक कक्ष,नागपुर ग्रामीण यांना गुप्त बातमीदारकडुन खात्रीशीर माहिती मिळाली की, **पोलीस ठाणे कळमेश्वर परिसरामध्ये जितेंद्र गोविंद कोल्हे हा स्वत:चे आर्थिक फायद्याकरीता महिला व मुलीनां पैशांचे आमिष देवून देहव्यापारास प्रवृत्त करून स्वता:हा चे सुदर्शन गेस्ट हाऊस लॉर्जीग मध्ये लोकांकडून पैसे घेवुन च अवैधरित्या कुटंनखाना चालवुन देहव्यापार करवुन घेत आहे.** नमुद पथकाने सुदर्शन गेस्ट हाऊस लॉजिंग, आकाश नगर, कळमेश्वर येथे धाड टाकली असता आरोपी लॉज चा मॅनेजर **आरोपी क्रं १) अजय नर्दकिशोर डेहरीया वय २९ वर्ष रा.लूघरवाडा पोस्ट बिंझावाडा त. सीवनी जि. सिवनी हा मिळुन आला. त्याला विचारपुस केली असता लॉज मालकाचे नाव आरोपी क्रं २) जितेंद्र गोविंद कोल्हे, वय ३७ वर्ष ,आकाश नगर, कळमेश्वर असल्याबाबत माहीती प्राप्त झाली.** पोलीसांनी पंचासमक्ष हॉटेल ची पाहणी केली असता नमुद हॉटेल मध्ये खोली क्रं २ मध्ये एक पिडीत महीला मिळुन आली. नमुद पिडीत महीला नागपुर येथुन कळमेश्वरला आल्याची माहीती पोलीसांनी समजली. आरोपी हे स्वत:च्या आर्थिक फायदयाकरिता नमुद महीलेला पैश्यांचे आमिष देवून देहव्यापार करण्यास प्रवृत्त करून जागा उपलब्ध करून देवुन तिच्याकडुन देहव्यापार करवुन घेत असल्याची माहीती पिडीतेने पोलीसांना दिली.

पोलीसांनी घटनास्थळावरून २ अॅड्रॉईड मोबाईलसह ,रोख रक्कम १५०० /— रूपये, आणि इतर साहीत्य असा १४,७००/— रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. तसेच नमुद मिळुन आलेल्या पिडीतेची सुटका करण्यात आली आहे. नमुद आरोपी क्रं १ आणि २ यांच्या विरूद्ध पोस्टे कळमेश्वर येथे कलम १४३, ३(५) सहकलम ३,४,५ स्त्रीया व मुली अनैतिक व्यापार (प्रतिबंध) अधिनियम अन्वये गुन्हा नोंद केला आहे. दोन्ही आरोपींना अटक करण्यात आली आहे.



# ९० दिवस काम केल्याची खोटी प्रमाणपत्रे देऊन शासनाची दिशाभुल करून फसवणूक केल्या प्रकरणी पुन्हा २ गुन्हे नोंद ४ आरोपी अटक

महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाच्या विविध कल्याणकारी योजनांचा लाभ घेण्यासाठी संबंधित व्यक्तीने (कामगाराने) बांधकाम क्षेत्रात किमान ९० दिवस काम केल्याचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक असते. यासाठी अधिकृत ठेकेदारांकडून कामगारांना प्रमाणपत्र देण्यात येते. मात्र काही ठेकेदार व ऑनलाईन सेवा केंद्र चालक यांनी प्रत्यक्षात काम न केलेल्या व्यक्तींना खोटी व बनावट ९० दिवस काम केल्याची प्रमाणपत्रे तयार करून दिल्याचे उघडकीस आल्याने नागपुर ग्रामीण जिल्हयात गुन्हे नोंद करण्यात आले आहे.

**पोलीस स्टेशन उमरेड** अंतर्गत महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाच्या उमरेड तालुका सुविधा केंद्रात सादर करण्यात आलेल्या ९० दिवसांच्या कामाच्या प्रमाणपत्रांची पडताळणी केली चौकशी दरम्यान गणेश मानकर, अंकुश भुजबळ व इतरांच्या मदतीने बनावट कागदपत्रे तयार करून शासकीय योजनांचा लाभ घेण्याचा प्रयत्न केल्याचे निष्पन्न झाले. सदर प्रकरणी दिनांक ०४/०६/२०२६ रोजी पोलीस स्टेशन उमरेड अंतर्गत कलम ३१८(४) आणि ३३६(३) भारतीय न्याय संहीता अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला असुन सदर प्रकरणी **१) अंकुश चिंतामण भुजबळ, वय ३२ वर्षे, रा. बेसुर ता. भिवापुर जि. नागपूर ( झेरॉक्स दुकानकर ) ,आरोपी क्रं २) हरेश शामराव दमके, वय. ५८ वर्षे, रा ब्राम्हणी ,ता उमरेड (९० दिवस काम केल्याचे खोटे प्रमाणपत्र घेणारे) ) , आरोपी क्रं ३) प्रफुल किशोर पाल, वय २८ वर्षे, रा बुधवारी पेठ, उमरेड (९० दिवस काम केल्याचे खोटे प्रमाणपत्र घेणारे) आणि आरोपी क्रं ४) गणेश इश्वर मानकर, वय ३५ वर्षे, रा. आपतुर, ता.कुही जि नागपुर (एजंट) यांना अटक करण्यात आली आहे.**

**पोलीस स्टेशन भिवापुर** अंतर्गत महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाच्या विविध योजनांचा लाभ घेण्यासाठी बांधकाम कामगारांनी सादर केलेल्या ९० दिवसांच्या कामाच्या प्रमाणपत्रांची पडताळणी करण्यात आली. त्या पडताळणी

दरम्यान असे निष्पन्न झाले की की, संबंधित ठेकेदार व कामगार यांनी संगनमत करून बनावट ९० दिवसांचे कामाचे प्रमाणपत्र तसेच इतर आवश्यक कागदपत्रे तयार केली. दिनांक ०५/०६/२०२६ रोजी सदर प्रकरणी आरोपी **१) सुरज निनावे, रा. भिवापूर, २) निखील झेरॉक्स सेंटरचा चालक, रा. भिवापूर, जि. नागपूर** यांच्या विरूध्द कलम ३१८(४) आणि ३३६(३) भारतीय न्याय संहीता अन्वये नोंद आहे.

## खुन करणाऱ्या आरोपीला मा. न्यायालयाने सुनावली आजीवन कारावासाची शिक्षा

**पोलीस स्टेशन सावनेर** :— फिर्यादी नामे मनोज रामविलास साहु, वय ५० वर्ष, रा. सावरमेंढा, त. सावनेर यांच्या तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन सावनेर येथे अप क्र. १०६५/२०२३ कलम ३०२, ५०४, ५०६ भांदवि. अन्वये गुन्हा नोंद झालेला होता. सदर गुन्हयाची हकीकत याप्रमाणे आहे की, दिनांक २९/११/२०२३ रोजी यातील फिर्यादीचा मुलगा मृतक नामे अंकीत साहु याचे आरोपीकडे उधारीचे पैसे होते. त्या पैशाचे कारणावरून दि. २९/११/२०२३ रोजी सायंकाळी १८.०० वा. सुमारास आरोपीसोबत भांडण झाले. त्यावेळी आरोपीने मृतकास शिवीगाळ करून धमकी दिली की, माझे नादी लागु नको, नाहीतर तुझे बरे होणार नाही असे म्हणुन मारण्याची धमकी दिली. त्यानंतर रात्री ०९.०० वा. दरम्यान फिर्यादीचे घरासमोरील पानठेल्याजवळ येवुन भांडण करून फिर्यादीच्या मुलाचे डोक्यात दगड मारून जिवानीशी ठार केले.

श्री शिवाजी नागवे, सहायक पोलीस निरीक्षक, नेमणुक पोलीस स्टेशन सावनेर यांनी सदर प्रकरणाचा सखोल तपास करून आरोपी विरूध्द सबळ पुराव्यानिशी दोषारोपत्र मा. न्यायालयात दाखल केले. **दिनांक ०६/०६/२०२६ रोजी मा. जिल्हा व सत्र न्यायधीश क्रं २ श्री एस. एच. ग्वालाणी यांनी नमुद आरोपी नामे सागर रामचंद्र खानकुरे, वय ३० वर्ष, रा. सावरमेंढा, ता. सावनेर यास कलम ३०२ भांदंवि मध्ये आजीवन कारावास व १०,०००/—रू. दंड, दंड न भरल्यास ०६ महिने सश्रम कारावास, कलम ५०४ भादंवि मध्ये ०१ वर्ष सश्रम कारावास व १,००० /— रूपये दंड , दंड न भरल्यास ०१ महीना साधा कारावास, कलम ५०६ भादंवि मध्ये ०१ वर्ष सश्रम कारावास व १,००० /— रूपये दंड , दंड न भरल्यास ०१ महीना सश्रम कारावास, अशी शिक्षा सुनावली आहे.**

सरकारचे वतीने ए.पी.पी. श्रीमती कल्पना पांडे यांनी काम पाहीले. सदर खटल्याच्या सुनावली दरम्यान श्री सागर खर्डे, सहा पोलीस अधिक्षक तथा उपविभागिय पोलीस अधिकारी, सावनेर उपविभाग, पोलीस निरीक्षक श्री विशाल गिरी, दोषसिध्दी कक्ष, नागपुर ग्रामीण, पोलीस निरीक्षक श्रीमती ऋतुजा जाधव, प्रभारी अधिकारी पोलीस स्टेशन सावनेर , सपोनि श्री विशांत नांदगाये, श्री रामदास कोराम, ब.नं २२४, नेम. दोषसिध्दी कक्ष, नागपुर ग्रामीण आणि पोहवा मधुकर आदमने, ब.नं ३७६, नेम. पोलीस स्टेशन सावनेर यांनी महत्वपुर्ण योगदान दिले.

## अपहार करणाऱ्या आरोपीला २४ तासात अटक
## ट्रेलर आणि लोखंडी बार असा एकूण ४३ लाख ९० हजारांचा मुद्देमाल जप्त
## मौदा पोलीसांची कामगिरी

दिनांक ०५/०६/२०२६ रोजी पोलीस स्टेशन मौदा येथे फिर्यादी हर्ष संतोष अग्रवाल, वय ३० वर्षे, रा. रामलक्ष्मी कॉलनी, कामठी, जि. नागपुर हे मित्तल ट्रेडर चे नावाने विविध किरकोळ कंपन्यांना स्टील ट्रेडींग सप्लाय करण्याचे काम करतात. बोरगांव ते कोदामेंढी दरम्यान अभी इंजीनियरींग कंपनिचा कॅम्प चारभा येथे सुरु असुन सदर कंपनिला पाहीजे असलेल्या ३२ एमएम चे लोखंडी बार बाबत फिर्यादीला मिळालेल्या ऑर्डरप्रमाणे फिर्यादीने ताडाली जि. चंद्रपुर येथील OFB TECH LIMITED कंपनिकडुन ३४ टन ४६० किलो चा माल एम एच ४० बी एफ ००८८ क्रमांकाचे १८ चक्का ट्रेलरमध्ये लोड करून माल ट्रेलर चालकाने चारभा येशील कॅम्प मध्ये माल खाली केला असता प्राप्त मालामध्ये ६ ते ७ टन माल कमी असल्याचे संबधीत फिर्यादीस कळविले. त्यादरम्यान चालक ट्रेलर सह पळुन गेला. त्यामुळे एकुण मुद्देमालापैकी ६ ते ७ टन माल किंमती ३,९०,०००/—रु. च्या मुद्देमालाची अफरातफर केल्याचे फिर्यादीचे तकारीवरुन गुन्हा नोंद करुन तपासात घेतला.

मा. श्री हर्ष ए. पोद्दार, वरीष्ठ पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा आणि श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण आणि श्री संतोष गायकवाड , उपविभागिय पोलीस अधिकारी ,कन्हान यांच्या मार्गदर्शनात मौदा पोलीस स्टेशनचे गुन्हे शोध

पथकाचे अधिकार आणि अंमलदार यांनी गुप्त बातमीदार आणि तांत्रिक पुराव्याच्या मदतीने १८ चक्का ट्रेलर एम एच ४० बी एफ ००८८ किंमत ४०,००,०००/— रुपये या वाहनाचा शोध घेवुन उमरी फाटा येथुन वाहन जप्त केला. यातील ट्रेलर चालक **मातादीन विधीचंद्र माहौर, वय ३९ वर्षे, रा. १२८ राजकुमारी स्कुल गल्ली, सुभाष नगर, मुरैना, ता.जि. मुरैना, राज्य मध्यप्रदेश** याचा २४ तासाच्या आत शोध घेवुन त्याला दिनांक ०६/०६/२०६ नागपुर शहारातुन ताब्य घेवुन त्यास सदर गुन्हयात अटक करुन आरोपीकडे कौशल्यपुर्ण विचारपुस करुन अंदाजे ७ टन लोखंडी बार किंमत ३,९०,०००/— रुपयांचा मुद्देमाल पुढील पंचनामा कारवाई करुन आरोपीकडुन जप्त केला. आरोपीला पोलीस कोठडी रिमांड मंजुर झाला आहे.





## पोलीस स्टेशन काटोल अंतर्गत खुन करणाऱ्या आरोपीला ३ तासाच्या आत अटक
## काटोल पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन काटोल** :— पोलीस स्टेशन काटोल येथे फिर्यादी सुधाकर श्रावण दुधकवळे वय ६० वर्ष रा. ढवळापुर ता. काटोल यांनी पोलीस स्टेशनला रिपोर्ट दिली की, दिनांक ०५/०६/२०२६ रोजी २०:३० वाजेच्या सुमारास फिर्यादीचा मुलगा मृतक नामे संदीप सुधाकर दुधकवळे, वय ३० वर्ष, रा. ढवळापुर याने आरोपी साहेबराव रामचंद्र कोहळे वय ५८ वर्ष, रा. ढवळापुर ता. काटोल याला तंबाखु खान्याचा चुना मागितला असता आरोपी याने मी खात ही नाही देत ही नाही असे म्हणुन भांडण करीत असता फिर्यादी याने मध्यस्ती करून भांडण सोडवुन आरोपीला घरी पाठवुन दिले थोड्या वेळाने रात्री पुन्हा आरोपी

साहेबराव रामचंद्र कोहळे आणि त्याला मुलगा विधीसंघर्षग्रस्त बालक हे फिर्यादीचे घरासमोर आले त्यावेळी मृतक हा घरासमोर हजर होता तेव्हा त्यांची एकमेकांसोबत भांडण झाले. त्यावेळी आरोपी साहेबराव रामचंद्र कोहळे आणि विधीसंघर्षग्रसत बालकाने यांनी काठीने मारहाण करून फिर्यादीच्या मुलाचा खुन केला. दिनांक ०६/०६/२०२६ रोजी सदर प्रकरणी पोलीस स्टेशन काटोल येथे कलम १०३(१), ३५२,३(५)भा.न्या.सं.अन्वये नोंद आहे.

मा. श्री हर्ष ए. पोद्दार ,वरीष्ठ पोलीस अधीक्षक नागपुर ग्रामीण जिल्हा , श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा, श्री पराग पोटे, उपविभागिय पोलीस अधिकारी यांच्या मार्गदर्शनात काटोल पोलीसांनी गुप्त बातमीदार आणि तांत्रिक पुराव्याच्या आधारे दिनांक ०६/०६/२०२६ रोजी **सदर गुन्हयातील आरोपी साहेबराव रामचंद्र कोहळे, वय ५८ वर्ष, रा. ढवळापुर ता. काटोल याचा ३ तासात शोध घेवुन त्याला ढवळापुर येथुन ताब्यात घेवुन तात्काळ अटक केली आहे.**

## अरोली पोलीस स्टेशन हद्दीतील अवैध दारू व्यवसायातील २ सराईत गुन्हेगारांना नागपुर जिल्हयातुन केले हद्दपार

**पोलीस स्टेशन अरोली हदद्दीतील अवैध दारू व्यवसायात सक्रिय आरोपी १) सुनील मोतीलाल ठाकरे, वय ५५ वर्षे, रा. रेवराल, ता. मौदा, जि. नागपुर, आाणि २) अल्ताफ चांद शेख, वय ६३ वर्षे, रा. अरोली, ता.मौदा, जि. नागपुर यांना महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ५६ (१) (अ) अन्वये उपविभागिय दंडाधिकारी, मौदा यांनी हद्दपार केले.**

वर नमुद आरोपी यांचेवर अवैध दारू विक्रीचे अनेक **गुन्हे नोंद** आहे. नमुद आरोपींचे गुन्हेगारी कृत्यांवर नियंत्रण ठेवण्याकरीता पोलीसांनी वेळोवेळी त्यांचे वर कारवाई करून गुन्हे नोंद केले तसेच त्यांचेवर प्रतिबंधक कार्यवाही सुध्दा केली आहे. परंतु आरोपी यांनी आपली गुन्हेगारी गतिविधी निरंतर सुरूच ठेवली. आरोपीतांच्या गुन्हेगारी कृत्यामुळे परीसारातील अनेकांना दारूचे व्यसन जडले आहे. तसेच त्यांच्या कृत्यामुळे शांततेचा भंग होवुन कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची दाट शक्यता असल्यामुळे नमुद अवैध दारू व्यवसायात सक्रिय गुन्हेगारांचा महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ५६ (१) (अ) अन्वये हद्दपार करण्याचा प्रस्ताव अरोली पोलीसांनी उपविभागिय पोलीस अधिकारी, रामटेक यांच्या

मार्फतीने उपविभागिय दंडाधिकारी, मौदा यांचे कडे पाठविला असता त्यांनी प्रस्ताव मंजुर करून वर नमुद आरोपी यांना **३ महीन्यांकरीता** नागपुर जिल्हयातुन हद्दपार केले आहे.

**नागपुर ग्रामीण जिल्हा पोलीसांतर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, नमुद आरोपी हे नागपुर ग्रामीण व नागपुर जिल्हा हद्दीत दिसुन आल्यास नजिकच्या पोलीस स्टेशनला तात्काळ माहीती द्यावी.**



**हद्दपार आरोपी सुनील मोतीलाल ठाकरे**



**हद्दपार आरोपी अल्ताफ चांद शेख**

## अवैधरित्या ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळणाऱ्या आरोपीतांविरूध्द गुन्हा नोंद. ३ लाख ८२ हजार ५० रूपयांचा मुद्देमाल जप्त भिवापुर पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन भिवापूर** :— दिनांक ०५/०६/२०२६ रोजी भिवापूर पोलीसांना गुप्त बातमीदारा मार्फत खात्रीशीर माहीती मिळाली की, मौजा माशा डोंगरी तलाव दिघोरा येथे काही इसम ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळत आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे भिवापूर पोलीस घटनास्थळी पोहचले असता, नमुद घटनास्थळी काही इसम ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळताना दिसुन आले. पोलीसांनी **आरोपी नामे १) युवराज राजेंद्र ठवकर, वय २४ वर्ष, रा. विरखंडी (धापर्ला) ता. भिवापूर, जि. नागपूर २) अल्पेश राजु सुखदेवे, वय २२ वर्ष, रा. दिघोरा ता. भिवापूर, जि. नागपूर ३) सुधीर मधुकर तिळके, वय ३७ वर्ष, रा. दिघोरा ४) प्रमोद पंढरी निनावे, वय ३४ वर्ष, रा. दिघोरा, ता. भिवापुर, जि. नागपुर यांना जागीच पकडले. काही आरोपी घटनास्थळाहुन पळुन गेले.**

पोलीसांनी घटनास्थळावरून ५२ तास पत्ते आणि रोख रक्कम १०,७५०/—रूपये, दोन आयफोन किंमती १,५०,०००/—रूपये, ०१ अॅडरॉईड मोबाईल, ०३ मोटरसायकल किंमती २,१५,०००/—रूपये, असा एकुण ३,८२,०५०/— रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. एकुण ०७ आरोपीतांविरूद्ध पोलीस स्टेशन भिवापूर येथे कलम १२ महाराष्ट्र जुगार अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.



# पोलीस ठाणे काटोल हद्दीतील मौजा पारधीबेडा डोंगरगाव शिवारात अवैधरित्या मोहाफुल गावठी दारू काढणाऱ्या आरोपीवर ०५ गुन्हे नोंद १ लाख ७५ हजार ९५० रूपयांचा मुद्देमाल जप्त काटोल पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन काटोल :—** दिनांक ०५/०६/२०२६ रोजी मा. श्री. हर्ष ए. पोद्दार, वरीष्ठ पोलीस अधीक्षक,नागपुर ग्रामीण जिल्हा आणि श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधीक्षक नागपुर ग्रामीण जिल्हा यांच्या मार्गदर्शनात आणि श्री पराग पोटे, उपविभागिय पोलीस अधिकारी, काटोल उपविभाग यांच्या नेतृत्वात सपोनि आशिषसिंह ठाकुर, प्रभारी अधिकारी पोलीस स्टेशन केळवद यांच्या विशेष पथकाने, दंगा नियत्रंण पथक आणि काटोल पोलीसांसह मौजा पारधी बेडा डोंगरगाव येथे अवैधरित्या मोहाफुल गावठी दारु काढणाऱ्यांवर कारवाई केली. पोलीस पथकाने **आरोपी नामे १) दिनेश मधुकर पवार, वय २८ वर्ष, रा. डोंगरगाव, ता. काटोल, जि. नागपुर याच्यासह २) ०४ महिला आरोपी विरूध्द कारवाई करून गुन्हे नोंद** केले. पोलीसांनी घटनास्थळावरून मोहाफुल सडवा आणि मोहाफुल गावठी दारू आणि साहित्य जप्त करत घटनास्थळावरील रनिंग भट्टया नष्ट केल्या.

**सदर कारवाईत पोलीसांनी घटनास्थळावरून पंचासमक्ष एकुण १) ३४०० लिटर मोहफुल सडवा २) ५२ लिटर मोहाफुल गावठी दारू आणि प्लास्टीक आणि लोखंडी ड्रम ,जळाउ लाकुड, दारू गाळण्याचे साहीत्या असा एकुण १,७५,९५०/— रूपयांचा माल जप्त केला. नाशवंत मुद्देमाल मौक्यावर पंचनामा कार्यवाही करून नष्ट करण्यात आला. नमुद आरोपी विरुद्ध महाराष्ट्र दारूबंदी अधिनियमान्वये ५ गुन्हे नोंदविण्यात आले आहे.**



## पोलीस ठाणे पाचगाव हद्दीतील चांपा बेडा शिवारात अवैधरित्या मोहाफुल गावठी हातभट्टीची दारू काढणाऱ्या आरोपीवर गुन्हा नोंद, ५४ हजार रूपयांचा मुद्देमाल जप्त


**पोलीस स्टेशन पाचगाव :—** दिनांक ०६/०६/२०२६ रोजी पाचगाव पोलीस स्टेशन हद्दीतील मौजा चांपा येथे मोहाफुल सडवा वापरून मोहाफुल हातभट्टीची दारू काढल्या जात आहे अशा गुप्त बातमीदाराच्या खात्रीशीर बातमीवरून मा. श्री. हर्ष ए. पोद्दार, वरीष्ठ पोलीस अधीक्षक,नागपुर ग्रामीण जिल्हा आणि श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधीक्षक नागपुर ग्रामीण जिल्हा यांच्या मार्गदर्शनात श्रीमती भाग्यश्री धीरबस्सी, उपविभागिय पोलीस अधिकारी, नागपुर उपविभाग (प्रभार उमरेड उपविभाग ) यांच्या नेतृत्वात पाचगाव पोलीस

,भिवापुर पोलीस यांच्यासह दंगा नियत्रंण पथक यांनी कारवाई करत मौजा चांपा शिवारात घटनास्थळावरील रनिंग हातभट्टया नष्ट केल्या.

**महीला आरोपीवर कारवाई करत घटनास्थळावरून पंचासमक्ष २०० लिटर मोहाफुल सडवा आणि १०० लिटर उखळता रसायन सडवा, ४० लिटर मोहाफुल गावठी दारू, प्लॅस्टीक आणि लोखंडी ड्रम आणि इतर असा एकुण ५४,०००/— रूपयांचा जप्त केला. नाशवंत मुद्देमाल मौक्यावर पंचनामा कार्यवाही करून नष्ट करण्यात आला. नमुद महिला आरोपीविरुद्ध महाराष्ट्र दारूबंदी अधिनियमान्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे.**







# नागपुर ग्रामीण जिल्ह्यातील ८३१ रेकॉर्डवरील आरोपीतांची घेण्यात आली आरोपी परेड

मा. श्री हर्ष ए. पोद्दार, वरीष्ठ पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा यांच्या मार्गदर्शनात आज दिनांक ०६/०६/२०२६ रोजी नागपुर ग्रामीण जिल्हयातील सर्व २३ पोलीस स्टेशनला शरीराविरूध्दचे गुन्हे करणारे, मालमत्ते विरूध्दचे गुन्हे करणारे, महीला व बाल अत्याचार गुन्हेगार ,अवैध दारू, जुगार इतर अवैध धंदयामधील रेकॉर्डवरील आरोपींतांची आरोपी परेड घेण्यात आली आहे. **एकुण ८३१ आरोपीतांची आरोपी परेड घेण्यात आली आहे.**

**नागपुर उपविभाग** :— नागपुर उपविभागातील पोलीस स्टेशन बुट्टीबोरी येथे ३४ आरोपी, पोलीस स्टेशन एमआयडीसी बोरी येथे ३० आरोपी आणि पोलीस स्टेशन बेला येथे ३४ आरोपी अशा एकुण ९८ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**उमरेड उपविभाग** :— उमरेड उपविभागातील पोलीस स्टेशन उमरेड येथे ४९ आरोपी , पोलीस स्टेशन कुही येथे ३१ आरोपी आणि पोलीस स्टेशन भिवापुर येथे २६ आणि पोलीस स्टेशन वेलतुर ३५ आरोपी पोलीस स्टेशन पाचगाव १४ आरोपी अशा एकुण १५५ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**सावनेर उपविभाग :—** सावनेर उपविभागातील पोलीस स्टेशन सावनेर येथे ६० आरोपी , पोलीस स्टेशन कळमेश्वर येथे ३७ आरोपी आणि पोलीस स्टेशन खापा येथे २९ आरोपी आणि पोलीस स्टेशन केळवद येथे ३५ आरोपी अशा एकुण १६१ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**कन्हान उपविभाग** :— कन्हान उपविभागातील पोलीस स्टेशन कन्हान येथे ३३ आरोपी , पोलीस स्टेशन मौदा येथे २० आरोपी पोलीस स्टेशन वडोदा येथे १४ आरोपी अशा एकुण ६७ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**रामटेक उपविभाग :—** रामटेक उपविभागातील पोलीस स्टेशन रामटेक येथे ४८ आरोपी , पोलीस स्टेशन पारशिवणी येथे ३४ आरोपी, पोलीस स्टेशन अरोली येथे ३५ आरोपी आणि पोलीस स्टेशन देवलापार येथे २३ आरोपी अशा एकुण १४० रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**काटोल उपविभाग :—** काटोल उपविभागातील पोलीस स्टेशन काटोल येथे ६३ आरोपी , पोलीस स्टेशन कोंढाळी येथे ३० आरोपी आणि पोलीस स्टेशन नरखेड येथे ७५ आरोपी आणि पोलीस स्टेशन जलालखेडा येथे ४२ आरोपी अशा एकुण २१० रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**(सर्व ६ उपविभागातील सर्व २३ पोलीस स्टेशन येथे एकुण ८३१ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे. )**



मा. पोलीस अधिक्षक
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
यांच्या मान्यतेने